# आत्मशक्ती
## ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्या; पेठ.

ता. वाळवा, जि. सांगली. हेड ऑफिस फोन – (०२३४२) २५२४११

## अधिमंडाळाची वार्षिक बैठकची नोटीस

सर्व सभासदानां कळविणेत येते की, ***संस्थेची ३२ वी वार्षिक सर्व साधारण सभा शनिवार तारीख २९/०९/२०१९ रोजी दुपारी ०३-०० वाजता "गिता मारूती सांस्कृतीक भवन, इस्लामपूर.***"येथे खालील विषयांचा विचार करणे करिता घेण्यात येईल. तरी सर्व सभासदांनी वेळेवर अवश्य उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### * सभेपुढील विषय *

१) दि. २३/०९/२०१८ मागील सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१/०३/२०१९ अखेर ताळेबंद व नफा-तोटा पत्रके वाचून कायम करणे.
३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०१८-२०१९ सालच्या नफ्याच्या वाटणीस मंजूरी देणे.
४) सन २०१८-२०१९ या सालात झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन २०१९-२०२० सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५) संचालक व नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
६) सन २०१९-२०२० या सालाकरिता अंतर्गत वैधानिक हिशोब तपासणीस नेमणे व त्याचा मेहनताना ठरविणे.
७) शाखा विस्तार करणे व नवीन संस्था विलिनीकरण करून घेणे बाबत.
८) संस्थेच्या पुढील वर्षाच्या ध्येय धोरणास मंजुरी देणे.
९) वैधानिक लेखापरिक्षकांच्या लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
१०) सन २०१७-२०१८ या वर्षाचा शासकीय लेखापरिक्षकाच्या अहवालाची दोषदुरूस्तीस मान्यता देणे.
११) सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२) संस्थेसाठी जागा, इमारत खरेदी बाबत विचार करणे.
१३) पोटनियम दुरूस्ती पान नं.
१४) ऐनवेळी येणाऱ्या विषयावर मा. अध्यक्षसाो. यांच्या परवानगीने विचार करणे.

स्थळ : पेठ
दि. १५/०९/२०१९

**श्री. संजय कृष्णात ढाभोळे** — जनरल मॅनेजर

**श्री. हंबीरराव बाबुराव पाटील** — चेअरमन

सूचना :-
१) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी ती १ तासाने घेण्यात येईल आणि अशा सभेस गणपुर्तीची आवश्यकता नाही.
२) ज्या सभासदांना सुचना करावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी दि. २३/०९/१९ पर्यंत संस्थेस पाठवाव्यात, आयत्यावेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत..
३) कृपया सभासदांनी सभेस येताना अहवाल सोबत आणावा.

**सभासद बंधू भगिनीनो,**

सर्व प्रथम संचालक मंडळाचे वतीने मी आपल्या सर्वांचे संस्थेच्या ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये हार्दिक स्वागत करतो. आर्थिक वर्ष सन २०१८-२०१९ चा ताळेबंद, वार्षिक अहवाल व संस्थेची प्रगती आपल्या समोर सांगताना आनंद होत आहे.

आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे व पाठिंब्यामुळे आपल्या संस्थेने प्रत्येक वर्षाप्रमाणे याही वर्षा प्रगतीचा आलेख आणखी उच्चावर नेला आहे. याचा मला अभिमान आहे.

### • संचालक मंडळ सभा :-

संस्थेच्या प्रगती मध्ये व एकूण कामकाजामध्ये मला संचालक मंडळाचे अतिशय उपयुक्त व सतत सहकार्य, प्रोत्साहन व साथ लाभलेली आहे. त्यांचा मी ऋणी आहे.

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १५ सभा झाल्या आहेत. या सभांमधून संचालक मंडळाच्या सर्व सदस्यांनी कामकाजात जबाबदारीने सक्रिय सहभाग घेतला व सभांमधील ठराव सर्वानुमते संमत करण्यात आले. संमत केलेल्या ठरावांची कार्यवाही झालेली आहे. नियोजन, अचूक निर्णय व एकसंघता यांत सर्वांचाच हातभार आहे. संचालकांची उपस्थिती १००% होती.

### • सभासद :-

सहकार वर्षात एकूण ३४१ व्यक्ती सभासद झाल्या आहेत. ७८ सभासदांनी राजीनामे दिले. ३१ मार्च २०१९ अखेर एकूण सभासद संख्या ८८०९ इतकी आहे. सभासद वाढीचे प्रमाण ३.०७%आहे. सभासदांनी वारस नोंद करावी.

### • भागभांडवल व निधी :-

संस्थेचे अधिकृत भागभांडवल मर्यादा रू. ५ कोटी असून वसुल भागभांडवल रू. ४ कोटी ३९ लाख ३१ हजार इतके आहे. संस्थेचे एकूण निधी रू.१० कोटी २१ लाख ७ हजार इतके आहेत. वाढीचे प्रमाण ४०.६४% आहे.

### • गुंतवणूक :-

संस्थेचे आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी संस्थेने विविध शेड्युल, सहकारी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकेत विविध मुदतीत रू. ३२ कोटी ८१ लाख ऐवढी गुंतवणूक केली आहे. तसेच उपविधीनुसार संस्थेने एकूण ठेवीच्या २०% पेक्षा जास्त गुंतवणूक तरलतेपोटी मार्गदर्शक तत्वाप्रमाणे केली आहे. वाढीचे प्रमाण ३६.३३ % इतके आहे. ही बाब ठेवीदारांच्या दृष्टीने खूप महत्वाची आहे.

### • ठेवी :- ९० कोटीचा टप्पा ओलंडला:-

संस्थेकडे असलेल्या ठेवी ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतीक असतात. ठेवी संकलनात वाढीची परंपरा चालु वर्षी अतिशय चांगली आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे. यावरून ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास अधिकाधिक वृधिंगत होत आहे हे दिसून येते. यावर्षी रू.१५ कोटी ९५ लाख ठेवीत भरघोस वाढ झाली असून एकूण ठेवी रू. ९० कोटी ३२ लाख इतक्या आहेत. सुरक्षितता, रोखता, क्षमता पाहूनच ठेवी ठेवाव्यात. कारण बचत म्हणजे भविष्याची तरतूद होय. ठेव वाढीचे प्रमाण गतसालच्या तुलनेत २१.४४% आहे.

### • कर्जे :-

संस्थेने अहवालसाली सभासदांना रू. ७० कोटी ६२ लाख इतके कर्ज वितरण केले आहे. एम. आय. एस. व्यवस्थापन व माहीतीप्रणालीमध्ये शासनाच्या परिपत्रकानुसार कर्ज व ठेवीचे प्रमाण (सी. डी. रेशो) राखण्यात आपल्या सर्वाच्या सहकार्याने यश मिळविले आहे. ऑडिट वर्ग '' अ '' मिळविला आहे. तसेच या वर्षी संस्थेने एकत्रीत व्यवसायाचा रू. १६० कोटी ९४ लाखाचा टप्पा ओलांडला. उत्पादकता, आवश्यकता, परतफेड क्षमता इ. निकष लावून कर्ज वाटप केले आहे. कर्ज वाढीचे प्रमाण २०.३९% आहे. तसेच सुरक्षित कर्जाचे प्रमाण ९७.०९% इतके आहे.

### • थकबाकी व कर्ज वसुली :-

अहवाल सालाअखेर संस्थेने रू.७० कोटी ६२ लाख ऐवढे कर्ज वाटप केले आहे. त्यापैकी फक्त रू. २ कोटी ५ लाख एवढी थकबाकी असून हे प्रमाण २.९१% इतके आहे. नियंत्रित व परिणामकारक पाठपुराव्यामुळे गतवर्षीपेक्षा हे प्रमाण कमी आहे. ही अभिमानास्पद गोष्ट आहे. सक्षम कर्जदारानांच कर्जवाटप या संस्थेच्या धोरणामुळे केवळ हे शक्य झाले आहे. ३% च्या आत थकबाकी आणण्यात स्टाफचा मोलाचा वाटा आहे. भविष्यातील एन. पी. ए. तरतुदीपोटी जादा रकमेची तरतूद केली असून सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब मोलाची आहे.

### • संचालक मंडळ व नातेवाईकांकडील कर्जे :-

| तपशील | ३१-३-२०१८ | २०१८-१९ वाटप | २०१८-१९ वसूल | ३१-३-२०१९ येणे | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| संचालक | ५०,२२,१९९ | २९,५०,००० | १६,२२,८५४ | ६३,४९,३४५ | नाही |
| नातेवाईक | ३१,७९,५६० | १२,००,००० | १४,९५,९०० | २८,८३,६६० | नाही |
| एकूण | ८२,०१,७५९ | ४१,५०,००० | ३१,१८,७५४ | ९२,३३,००५ | -- |

### • मान्यवरांच्या भेटी :-

मा. आ. जयंतराव पाटील प्रदेश अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र राज्य, मा. आ. मानसिंगराव नाईक माजी आमदार महाराष्ट्र राज्य, मा. श्री. अतुल भोसले अध्यक्ष,श्री विठ्ठल-रूक्मीणी देवस्थान

कमिटी, पंढरपूर, मा. श्री. शेखर चरेगांवकर अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकार परिषद, मा. श्री. संदीप पाटील व्यवस्थापक सहकार भारती प्रशिक्षण संस्था कराड, मा. श्री. नितीन वाणी सर, मा. श्री. ए. व्ही. डफळे सहाय्यक निबंधक सह. संस्था, इस्लामपूर.

### • नफा विनीयोग :-

आवश्यक त्या तरतुदी करून निव्वळ नफा रू. १,४१,११,१११.८० इतका झाला आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून सभासदानां १०% लाभांश देण्याची शिफारस केली आहे. नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण १.३९ % आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करण्याची संचालक मंडळाने शिफारस केली आहे.

| अ. नं. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | रिझर्व्ह फंड (२५%) | ३५,२७,७७९-३५ |
| २ | लाभांश (१०%) | ३९,५४,४६९-०० |
| ३ | इमारत निधी | २१,५०,०००-०० |
| ४ | बुडीत कर्ज निधी | ३१,००,०००-०० |
| ५ | धर्मादाय निधी | १,२८,०००-०० |
| ६ | सभासद कल्याण निधी | २,००,०००-०० |
| ७ | लाभांश समिकरण निधी | ५,००,०००-०० |
| ८ | शिक्षण प्रचार व प्रसार निधी | १,५०,०००-०० |
| ९ | कर्मचारी कल्याण निधी | ४,००,०००-०० |
| | शिल्लक नफा | ८६३-४५ |
| | एकूण | १,४१,११,१११-८० |

### • विशेष आभार :-

आपल्या संस्थेची चौफेर प्रगती झाली या प्रगतीमध्ये सहकार भारती प्रशिक्षण संस्था, कराड यांच्या प्रशिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. सहकार भारती प्रशिक्षण केंद्रा चे मुख्य कार्यवाहक मा. शेखर चरेगांवकर तसेच श्री. संदीप पाटील व श्री. नितीन वाणी यांचे वेळोवेळी अमुल्य मार्गदर्शन संस्थेला लाभत आहे. सहकारात सुसंस्कार रूजविण्याचे कार्य सहकार भारती करीत आहे. सहकार भारतीस मनापासून धन्यवाद. तसेच मा. श्री. राजेश मंत्री इस्लामपूर यांनी व्यक्तीमत्व विकास यामधून संचालक व कर्मचारी यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून क्षमता वाढविण्याचे काम केले त्याबद्दल त्यांचेही हार्दीक आभार !

### • वैधानिक लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २०१८-२०१९ चे शासकीय लेखापरिक्षण श्री. बी. बी. सुल्याण ॲन्ड असोशिएटस्,मिरज यांनी केले आहे. त्यांच्या मौलीक मार्गदर्शनामुळे संस्था प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे. संस्थेच्या एकंदर कामकाजाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले असून सन २०१८-२०१९ अखेर संस्थेला ऑडीट वर्ग '' अ '' मिळाला आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार !

### • सेवकवर्ग व प्रशिक्षण :-

संस्थेचा अविभाज्य व महत्वाचा घटक असलेल्या सेवकांचा सहभाग संस्थेच्या प्रगतीत व कार्यात आहेच त्यांच्या सुखसोई, प्रशिक्षण, संरक्षण अशा बाबीकडे संस्थेने नेहमीच अत्मीयतेने लक्ष दिले आहे. सर्वच सेवकांना अहवाल वर्षात सहकार भारती सहकार प्रशिक्षण संस्था, कराड. व इतर अनुभवी तज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्याचे काम केले आहे.

अहवाल सालात संस्थेकडे एकूण ४७ कर्मचारी काम करीत आहेत. सेवकासाठी प्रॉव्हडंड फंड, ग्रच्युइटी, विमा इत्यादी सुविधा लागु केलेल्या आहेत. या शिवाय घरबांधणी, वाहन खरेदी, गृह उपयोगी वस्तु, मुलांचे शिक्षणासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे इत्यादी काम सुरू केलेले आहे. या सुविधा सेवकाना उपलब्ध करून दिल्या जातात.

पुन्हा एकवेळ आपणा सर्वांचे तसेच विविध वृत्तपत्राचे पत्रकार, अनेक ज्ञात, आज्ञत व्यक्ती व संस्थानी वेळोवेळी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष केलेल्या सहकार्या बद्दल मी आभार व्यक्त करून संचालक मंडळाच्या वतीने ३२ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा इ. हिशोब पत्रके आपल्या मंजुरीसाठी सादर करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी ही विनंती.

✼ स्थळ:- पेठ

आपला

श्री. हंबीरराव बाबुराव पाटील
चेअरमन

### • श्रद्धांजली :-

संस्थेचे शिवाजीराव देशमुख, विलासराव शिंदे सांगली जिल्हा राष्ट्रवादी पार्टीचे अध्यक्ष, नानासोा महाडीक, कुसुमताई नायकवडी (वैभव नायकवडी यांची आई), मोहन गणपती पाटील, उत्तम गंगाराम कदम, सागर पाटील यांच्या चुलती, वसंतरावजी पुदाले माजी चेअरमन पलुस सह.बँक, पलुस.

तसेच अहवाल सालामध्ये थोर नेते, स्वातंत्र्य सैनिक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, तंत्रज्ञ, कलावंत, शिक्षण तज्ञ, सहकार व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि आमचे संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, शेतकरी बंधु दिवंगत झाले या सर्वांना आमची विनम्र श्रध्दांजली. त्यांच्या स्मृतीस नतमस्तक होवून आम्ही भावपूर्ण श्रध्दांजली वाहतोय ! मृतात्म्यास सदगती मिळो ही ईश्वर चरणी प्रार्थना !

**दि. ३१/०३/२०१९ पर्यंत**

| भांडवल व देणी | ३१/०३/२०१९ रक्कम रूपये पैसे | ३१/०३/२०१८ रक्कम रूपये पैसे |
|---|---|---|
| अधिकृत भागभांडवल | ५,००,००,०००-०० | ५,००,००,०००-०० |
| वसूल भागभांडवल | ४,३९,३१,४७७-०० | ३,९४,५०,०६८-०० |
| राखीव व इतर निधी | ५,८१,७६,२२३-६५ | ३,३१,५२,०७५-९५ |
| ठेवी | ९०,३२,२९,७११-५४ | ७४,३७,१६,९७९-५९ |
| नाममात्र सभासद फी | १७,८००-०० | १६,३००-०० |
| एन.पी.ए. तरतूद | ४,५८,६६,७६०-०० | ४,१८,६६,७६०-०० |
| कर्जावरील येणे थक व्याज | १,४९,७२,१८८-१० | १,७४,१८,२१८-६० |
| इतर देणी | ३,१६,६७,५२५-०२ | ७४,३७,१०१-७० |
| तारण कॅश क्रेडीट | २५,३९,१०८-४० | १,७१,६५,७७५-१० |
| जीएसटी | २,७८,४८९-८८ | २,३१,७२२-४२ |
| नफा | १,४१,११,१११-८० | १,१५,११,१११-७८ |
| अ) मागील शिल्लक नफा | ३२५-७८ | ५१४-५८ |
| ब) चालु वर्षाचा नफा | १,४१,१०,७८६-०२ | १,१५,१०,७८६-८२ |
| **एकूण -** | **१,११,४७,९०,३९५-३९** | **९१,१९,६६,११३-१४** |

**तापासले, बरोबर आहे, आमचे त्याच दिनांकाचे अहवालास अनुसरून,**
**श्री. बी. बी. सुल्याण & असोशिएटस् , मिरज**
**सनदी लेखापरिक्षक, मिरज**

**श्री. संजय कृष्णात दाभोळे**
जनरल मॅनेजर

**श्री. अंबादास बजरंग पेठकर**
**श्री. शेखर दत्तात्रय बोडरे**
व्हा. चेअरमन

**श्री. हंबीरराव बाबुराव पाटील**
चेअरमन

**श्री. प्रदिप बापुराव पाटील**
जेष्ठ संचालक

**श्री. अरूण यशवंत कदम**
संचालक

## N नमुना ताळेबंद पत्रक

| जिंदगी व येणी | ३१/०३/२०१९ रक्कम रूपये पैसे | ३१/०३/२०१८ रक्कम रूपये पैसे |
|---|---|---|
| रोख व बँक शिल्लक | ५,६३,१२,७६४-८५ | ३,२४,४६,७९६-१४ |
| गुंतवणूक | ३२,८१,९३,१३३-०० | २६,६२,८४,७८३-०० |
| कर्जे | ७०,६२,४८,८८४-४० | ५८,६६,१२,४४५-९० |
| स्थावर व जंगम मालमत्ता | ७१,२८,९११-८४ | ७९,६२,४९६-९४ |
| कर्जावरील येणे व्याज | १,४९,७२,१८८-१० | १,७४,१८,२१८-६० |
| इतर येणी | १८,७८,७२८-०० | १०,५५,०२१-०० |
| जीएसटी | ५५,७८५-२० | १,८६,३५१-५६ |
| एकूण - | १,११,४७,९०,३९५-३९ | ९१,१९,६६,११३-१४ |

श्री. महादेव शामराव पाटील

श्री. डॉ. मुसाअली महमंद जमादार

श्री. डॉ. संजय दिनकर पाटील

श्री. संजय महादेव पाटील

श्री. धनपाल माणिक जाधव

श्री. जयवंतराव महादेव जाधव

सौ. मंगल रविंद्र पाटील

सौ. अरूणा निवास पाटील

श्री. सुभाष यशवंत पाटील

श्री. ॲड. प्रमोद उर्फ प्रितम अरूण सांभारे

**दि. ३१/०३/२०१९ पर्यंत**

| खर्च | ३१/०३/२०१८ रक्कम रूपये पैसे | ३१/०३/२०१८ रक्कम रूपये पैसे |
|---|---|---|
| दिलेले व्याज | ६,४६,३१,२८४–०० | ६,६९,७५,९८८–०० |
| व्यवस्थापन खर्च | १,१९,७८,४६९–२० | १,०८,२८,११३–०० |
| इतर खर्च | २,८१,३९,७८८–२२ | २,१४,५४,२६८–४१ |
| निवळ नफा | १,४१,१०,७८६–०२ | १,१५,१०,५९७–२० |
| एकूण – | ११,८८,६०,३२७–४४ | ११,०७,६८,९६६–६१ |

**श्री. संजय कृष्णात दाभोळे**
जनरल मॅनेजर

**श्री. अंबादास बजरंग पेठकर**
**श्री. शेखर दत्तात्रय बोडरे**
व्हा. चेअरमन

**श्री. हंबीरराव बाबुराव पाटील**
चेअरमन

**श्री. प्रदिप बापुराव पाटील**
संचालक

**श्री. अरूण यशवंत कदम**
संचालक

### N नफा - तोटा पत्रक

| उत्पन्न | ३१/०३/२०१८ रक्कम रूपये पैसे | ३१/०३/२०१८ रक्कम रूपये पैसे |
|---|---|---|
| मिळालेले व्याज | ११,६५,३६,३९७-५० | १०,८०,७७,९६३-५० |
| इतर उत्पन्न | २३,२३,९२९-९४ | २६,९१,००३-११ |
| एकूण - | ११,८८,६०,३२७-४४ | ११,०७,६८,९६६-६१ |

श्री. महादेव शामराव पाटील

श्री. डॉ. मुसाअली महमंद जमादार

श्री. डॉ. संजय दिनकर पाटील

श्री. संजय महादेव पाटील

श्री. धनपाल माणिक जाधव

श्री. जयवंतराव महादेव जाधव

सौ. मंगल रविंद्र पाटील

सौ. अरूणा निवास पाटील

श्री. सुभाष यशवंत पाटील

श्री. ॲड. प्रमोद उर्फ प्रितम अरूण सांभारे

# लेखापरिक्षकाचा अहवाल

नमुना '' एन - २ ''
कलम ८१ आणि नियम ६९ (३) पहा
सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षकांच्या अहवालाचे निदर्शनात्मक स्वरूप

प्रति,
अध्यक्ष/सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी
आत्मशक्ती ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या., पेठ.
ता. वाळवा, जि. सांगली
शहराचे नांव - पेठ.
विषय :- नेमणूकपत्र संदर्भ क्र. दि.२९/०९/२०१८
प्रमाणित लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल

१. आत्मशक्ती ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या., पेठ. यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण आंम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंदपत्रक ३१ मार्च, २०१९ पर्यंतचे असून वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहीती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आंम्ही १ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी**

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधून मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी**

३. केलेल्या लेखापरिक्षणवर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आंम्ही केलेल्या लेखापरिक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंन्स ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आंम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नितित्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आंम्ही पाळली आहे. आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्वाच्या चुकीच्या विवरणपत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आंम्ही केले आहे.

४. लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियत्रंण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमा खर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर, आणि जमा खर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५. लेखापरिक्षेचा पुरावा जो आंम्ही मिळविला आहे तो आभिप्राय पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

**अभिप्राय**

६. आमच्या मतानुसार आणि आंम्हास मिळालेल्या पूर्ण माहीतीनुसार आणि आंम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिध्द केलेली संस्थेला जरूरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केला आहे.

(एक) ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च, २०१९

(दोन) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत/जमा आणि खर्च त्यावर्षीच्या शेवटच्या दिवशी आणि इतर कायदेशीर आणि नियामक बाबीवरील अहवाल

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदीनुसार ताळेबंदपत्रक आणि नफा तोटा विविरण पत्रक तयार केलेले आहे.

आंम्ही अहवाल देतो की,

८. (अ) आंम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरूर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आंम्हास असे आढळुन आले आहे की, ते समाधानकारक आहे.
(ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करणेत आले आहेत.
(क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तीच्या शाखाकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९. लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रके आणि नफा तोटा आणि खर्चाचे हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

१०. आंम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो
(एक) या अहवालासंदर्भात ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.
(दोन) आंम्ही पुस्तकांची तपासणी केलेनंतर संस्थेची योग्य ती ताळेबंदपत्रके जी अधिनियमानुसार जरूरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.
(तीन) आंम्ही लेखापरिक्षा केलेल्या शाखांचे ताळेबंदपत्रक शाखा लेखापरिक्षकांनी केलेले असून, तो आंम्हाला जरूरीचा आहे त्याप्रमाणे दिला आहे.
(चार) लेखापरिक्षा चालु असणाऱ्या वर्षी संस्थेला '' अ '' वर्ग मिळाला आहे.

**स्थळ :** पेठ
**दिनांक :** २९/०८/२०१९

**बी. बी. सुल्याण & असोशिएटस्**
सनदी लेखापरिक्षक, मिरज

## १७ वी घटना दुरूस्तीनुसार क्रियाशील सभासदच संस्थेच्या व्यवहारात सहभागी होवू शकतात व मतदान करू शकतात.

### क्रियाशील सभासाच्या अटी व नियम

१) त्याने मागील सलग पांच सर्वसाधारण सभापैकी किमान एका सभेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

२) त्याने संस्थेचा किमान रू. १०००/- चा भाग धारण केलेला असावा.

३)अ) क्रियाशील सभासदाचा व्यवसायीक थेट सहभाग म्हणजे मागील सलग पाच वर्षापैकी किमान एक वर्षासाठी रूपये पाच हजार किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचे कर्ज घेतलेले असले पाहीजे. सदर कर्ज व्यवहार संपूर्ण कालावधीमध्ये केव्हाही अनुत्पादक कर्जामध्ये समाविष्ठ नसले पाहीजे.

किंवा

ब) क्रियाशील सभासदाच्या व्यवसायीक थेट सहभाग म्हणजे मागील सलग पाच वर्षापैकी किमान एक वर्षासाठी रक्कम रू. १०,०००/- किंवा त्यापेक्षा जास्त ठेवली पाहीजे.

क) क्रियाशील सभासद होण्यासाठी वरीलपैकी पात्रता क्र. १ व २ या बंधनकारक असून पात्रता क्र. ३ मधील अ, ब, किंवा क यापैकी कोणत्याही एका पात्रतेची पुर्तता करणे आवश्यक राहील.

* अक्रियाशील सभासद वरील अटीची पूर्तता करून केव्हाही क्रियाशील बनु शकतो.

## ❁ सहकाराची व्याख्या ❁

संस्था म्हणजे या अधिनियमान्वये संयुक्त मालकी आणि लोकशाही नियंत्रण असलेल्या उपक्रमाव्दारे आपल्या सामाईक गरजा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि सहकार तत्वांचे आणि मुल्यांचे अनुसरण करण्यासाठी स्वच्छेने एकत्र आलेल्या व्यक्तींचा स्वायत्त अधिसंघ असलेली संस्था असा आहे.

## ❁ सहकाराची सात मुलतत्वे ❁

१) स्वखुशीने खुले सभासदत्व

२) सभासदांचे लोकशाही नियंत्रण

३) सभासदांची अर्थिक भागीदारी

४) स्वायतता व स्वातंत्र्य

५) शिक्षण, प्रशिक्षण आणि माहीती

६) सहकारी संस्थांमधील परस्पर सहकार

७) समुदायाप्रती निष्ठा

***अधिक माहीतीसाठी संस्थेच्या जवळच्या शाखेशी संपर्क साधा***

## गुंतवणुकदारांनी पतसंस्थेची सुरक्षितता कशी पहावी ?

| तपशिल | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|
| भागभांडवल | २ को.३९ ला.३३ ह. | २ को.७४ ला.४३ ह. | ३ को. ३२ ला.७२ ह. | ३ को.९४ ला.५० ह. | ४ को.३९ ला.३१ ह. |
| ठेवी | ३७ को.७९ ला.६९ ह. | ५४ को.६९ ला. | ६४ को.६५ला.५१ ह. | ७४ को.३७ ला.१६ ह. | ९० को.३२ ला.२९ ह. |
| कर्जे | २९ को.२९ ला.१३ ह. | ३७ को.५२ ला. | ५२ को.४३ला. ८५ ह. | ५८ को.६६ ला.१२ ह. | ७० को.६२ ला.४८ ह. |
| नफा | ५६ ला. ११ ह. | ८१ ला. ११ ह. | १ को.०१ ला. | १ को.१५ ला. ११ ह. | १ को.४१ ला. ११ ह. |
| सभासद | ६६३९ | ७१२७ | ७७९४ | ८५४६ | ८५४६ |
| थकबाकी | ३.२९% | ३.४५% | २.४६% | २.८५% | २.९१% |
| व्यवसाय | ६७ को.०८ ला.८२ ह. | ९२ को.२२ ला. | ११४ को. ७७ ला. | १३३ को. ०३ ला. | १६० को. ९४ ला. |
| ऑडीट वर्ग | ' अ ' | ' अ ' | ' अ ' | ' अ ' | ' अ ' |

१) संस्थेस लेखा परिक्षण वर्ग '' अ '' किंवा '' ब '' आहे का ?.........होय सुरूवातीपासुन

२) जमा ठेवी, भागभांडवल, निधी पैकी ७०% पर्यंतच कर्ज वाटप आहे का ?........होय

३) संस्थेच्या व्यवसायात सातत्याने वाढ होत आहे का ?........होय

४) संस्थेची नफा क्षमता चांगली आहे का ? व त्यात सातत्याने वाढ होत आहे का ?.....होय

५) संस्था लाभांश देते का ? व त्यात सातत्याने वाढ होत आहे का ?......होय    १०% लांभाश

६) संस्थेची नेट गुंतवणुक ३० % आहे का ?.......होय

७) संस्थेचा एन.पी.ए. किती ?...... संस्थेचा नेट एन.पी.ए. १.८१%

### संस्थेच्या नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकानुसार खालील प्रमाणकांचा अभ्यास करावा.

| अ. नं. | गुणोत्तराचे सुत्र | आदर्श शे.प्रमाण | प्रत्यक्ष शे. प्रमाण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | स्वनिधीचे खेळत्या भांडवलाशी<br>स्वनिधी / खेळते भांडवल X१०० | ५% | ९.२८% | चांगला |
| २) | स्वनिधीची गतसालशी वाढीचे<br>प्रमाण स्वनिधीची वाढ / गतसालचा स्वनिधी X१०० | ७.५% | ४०.६४% | उत्कृष्ठ |
| ३) | निव्वळ एन. पी. ए. चे प्रमाण<br>निव्वळ एन.पी.ए. / निव्वळ कर्जे X१०० | ०% | १.८१ % | योग्य |
| ४) | ढोबळ एन.पी.ए.चे प्रमाण<br>ढोबळ एन.पी.ए. / ढोबळ कर्जे X१०० | ५% | ८.१९% | घट अपेक्षीत |
| ५) | सरासरी ठेव वाढीचे प्रमाण<br>सरासरी ठेव वाढ / गत सालातील सरासरी ठेव X१०० | १५% | १२.८९% | ठेव वाढ अपेक्षीत |
| ६) | मिळालेल्या व्याजाचे कर्जाशी<br>एकूण मिळालेले व्याज / एकूण कर्जे X१०० | १५% | १६.५०% | उत्कृष्ठ |
| ७) | निव्वळ नफ्याचे स. खे. भांडवलाशी<br>निव्वळ नफा / सरासरी खेळते भांडवल X१०० | १% | १.५०% | रास्त |
| ८) | निव्वळ नफ्याचे कर्ज + गुंतवणूक<br>निव्वळ नफा / कर्ज + गुंतवणूक X१०० | १.२५% | १.३६% | रास्त |
| ९) | निव्वळ नफ्याचे स्वनिधीशी प्रमाण<br>निव्वळ नफा / स्वनिधी X१०० | १०% | १३.८१% | रास्त |
| १०) | व्याजातील सरासरी मार्जिन<br>स.ठेवीवर दिलेलेव्याज वजा / स. कर्जावरील मिळालेले व्याज X१०० | ३% | ६.८८% | उत्कृष्ठ |
| ११) | शि. नफा व सर्व निधीस वर्ग नफ्याचे<br>शि. नफा व निधीस वर्ग नफा / निव्वळ नफा X१०० | ७५% | २४४.४२९% | उत्कृष्ठ |
| १२) | व्यवसायातील नफ्याचे प्रमाण<br>व्यवसायातील नफा / सरासरी खेळते भांडवल X१०० | २% | २.१५% | उत्कृष्ठ |
| १३) | व्यव. खर्चाचे स. खेळत्या भांडवलाशी<br>व्यवस्थापन खर्च / सरासरी खेळते भांडवल X१०० | २.५% | २.१२% | रास्त |
| १४) | सी. डी. रेशो<br>कर्जे–(कर्ज वाटपास उप. स्वनिधी) / एकूण ठेवी X१०० | ६५ ते ७०% | ६९.३२ % | रास्त |
| १५) | मुदत ठेवीचे एकूण ठेवीशी प्रमाण<br>एकूण मुदत ठेवी / एकूण ठेवी X१०० | ७०% | ७७.६४% | उत्कृष्ठ |
| १६) | अनुउत्पादक गुंतवणुकीचे प्रमाण<br>अनुउत्पादक गुंतवणुक / एकूण गुंतवणुक X१०० | ५% | ०.०६% | उत्तम |
| १७) | नफ्याचे उत्पन्न देणाऱ्या सरासरी संपत्ती मिळकत प्रमाण<br>Return on Average Earning Assets<br>निव्वळ नफा / सरासरी उत्पन्न देणारी संपत्ती X१०० | १.२५% (+) | १.५३% | उत्कृष्ठ |
| १८) | नफ्याचे सरासरी स्वनिधीशी प्रमाण<br>Return on Average Owned Funds<br>निव्वळ नफा / सरासरी स्वनिधी X१०० | २०% (+) | १८.७७% | नफा क्षमता वाढविने आवश्यक |
| १९) | निव्वळ व्याजातील दुरावा<br>Net Interest Margin<br>निव्वळ व्याज +नि.व्याज खर्च / सरासरी उत्पन्न देणारी संपत्ती X१०० | ३.५% (+) | ५.६३% | रास्त |
| २०) | बिगर व्याज उत्पन्नाचे बिगर व्याज खर्चाशी प्रमाण<br>Ratio on Non Interest Income to Non Interest Expenditure<br>बिगर व्याज उत्पन्न / बिगर व्याज खर्च X१०० | ६०% | १२.७१% | इतर उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे |
| २१) | खर्च उत्पन्न प्रमाण<br>Cost Income Ratio<br>शि. नफा व निधीस वर्ग नफा / निव्वळ नफा X१०० | ५०% (-) | ३६.६३% | रास्त |

# आत्मशक्ती
## ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्या; पेठ.

### ✻ कायदा सल्लागार ✻

अॅड. दिलीप रामराव पाटील, पेठ.
अॅड. अमोल जे. पाटील, पेठ.
अॅड. मोहनराव ए. पाटील, येडेनिपाणी
अॅड. एस . एस.. पाटील, सांगली
अॅड. एस. एम. जकाते, सांगली
अॅड. एम. एम. मुळे, पलूस
अॅड. व्ही. जी. जाधव, पलूस
अॅड. भगतसिंग पाटील, पेठ

### ✻ व्हॅल्युएटर ✻ (सोने तारण कर्जासाठी)

श्री. हणमंत गोपीनाथ पोतदार
शाखा पेठ
श्री. तुषार प्रकाश पेठकर
शाखा इ,पूर
श्री. संजय भानुदास अवसरे
शाखा कासेगांव
श्री. नवनाथ निवृत्ती पाटील
शाखा तांदुळवाडी
श्री. राजाराम नामदेव जाधव
शाखा पलूस.

### ✻ व्हॅल्युएटर ✻ (शेती, घरतारण कर्जासाठी )

१) श्री. गणेश बी. पाटील, इस्लामपूर
२) श्री. दिलीप पां. कुशिरे, इस्लामपूर
३) श्री. दिलीप आ. जानुगडे, कराड
४) श्री. विकास बी. गावडे, इस्लामपूर

### ✻ व्हॅल्युएटर ✻ (वाहन तारण कर्जासाठी )

श्री. अरूण एम. पाटील, इस्लामपूर.

### ✻ बँकर्स ✻

✻ सांगली जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.,सांगली (शाखा पेठ,इस्लामपूर,कासेगांव,तांदुळवाडी,शेडगेवाडी,मांगले,पलूस.)
✻ कृष्णा सहकारी बँक लि.,शाखा इस्लामपूर, शिवनगर
✻ पलूस सहकारी बँक लि.,पलूस
✻ राजारामबापू सहकारी बँक लि.,पेठ.
✻ वारणा सहकारी बँक लि.,शाखा मांगले.
✻ सत्यविजय सहकारी बँक लि.,शाखा इस्लाामपूर.
✻ भारती सहकारी बँक लि.,शाखा इस्लाामपूर.

✻ मार्गदर्शक :-

श्री.शेखर चरेगांवकर, अध्यक्ष, सहकार भारती प्रशिक्षण केंद्र,कराड तसेच श्री. संदीप पाटील व श्री. नितीन वाणी श्री. राजेश मंत्री, इस्लामपूर. व्यक्तीमत्व विकास.

### ✻ कर्मचारी ✻

| | | |
|---|---|---|
| १) श्री. संजय कृष्णात दाभोळे | जनरल मॅनेजर | ७७७४०१७५४१ |
| २) श्री. रमेश रघुनाथ पाटील | शाखाधिकारी | ७७७४०१७५४६ |
| ३) श्री. पांडुरंग दत्तात्रय शिंदे | शाखाधिकारी | ७७७४०१७५५३ |
| ४) श्री. बजरंग संभाजी माळी | शाखाधिकारी | ७७७४०१७५५१ |
| ५) श्री. पोपट श्रीरंग माळी | शाखाधिकारी | ७७७४०१७५४९ |
| ६) श्री. अनिल नारायण फल्ले | शाखाधिकारी | ७७७४०१७५५२ |
| ७) श्री. चंद्रकांत शहाजी पाटील | शाखाधिकारी | ७७७४०१७५४४ |
| ८) श्री. सुरेश पांडुरंग पाटील | शाखाधिकारी | ७७७४०१७५४८ |
| ९) श्री. चंद्रशेखर शंकर सुतार | कर्ज वितरण व मंजुरी वि. | ७७७४०१७५४२ |
| १०) श्री. जोतीराम शंकर साळुंखे | वसुली व लेखापरिक्षण वि. | ७७७४०१७५४३ |
| ११) श्री. प्रविणकुमार वसंत जाधव | अकौन्ट व शेअर्स विभाग | ७७७४०१७५५० |
| १२) श्री. सचिन कृष्णात कोळेकर | अस्थापन व E.D.P. वि. | ७७७४०१७५४५ |
| १३) श्री. सचिन अर्जुन पाटील | पासिंग ऑफिसर | ७७७४०१७५४७ |
| १४) श्री. अशोक रघुनाथ कोळेकर | कॅशिअर | ९३७०७२१६६३ |
| १५) श्री. गणपती रामचंद्र माळी | कॅशिअर | ९९२१९२०८४९ |
| १६) सौ. संगिता माणिक माळी | कॅशिअर | ८४८३९२७३०० |

### * कर्मचारी *

| | | |
|---|---|---|
| १७) श्री. प्रमोद शंकर पेठकर | कॅशिअर कम पासिंग ऑफिसर | ९२८४१०८८९१ |
| १८) सौ. सविता जयसिंग पाटील | कॅशिअर | ९८२३०७८२६६ |
| १९) श्री. जालिंदर विलास जाधव | कॅशिअर | ९८८१७५५७८१ |
| २०) श्री. महेश संजीवन माने | क्लार्क | ९७६३४१७१८१ |
| २१) श्री. शिवचलेश्वर शिवलिंग स्वामी | क्लार्क | ९६२३७२६२७५ |
| २२) सौ. शितल राजेंद्र माळी | क्लार्क | ८६२३०४०२६३ |
| २३) श्री. कुलदिपक महादेव माळवदे | कॅशिअर | ९८५०८०७१९८ |
| २४) श्री. फिरोज सिराज मुल्ला | क्लार्क | ७७९८७०९६९१ |
| २५) श्री. जयवंत विश्वनाथ कदम | क्लार्क | ९६५७८११३१८ |
| २६) श्री. सागर दिलीप मदने | क्लार्क | ७०२०६८६६५९ |
| २७) श्री. बाजीराव रंगराव पाटील | क्लार्क | ९७३०७३५९९३ |
| २८) श्री. हणमंत राजाराम पाटील | क्लार्क | ८६२३०४०२६५ |
| २९) श्री. संतोष अशोक कुंभार | क्लार्क | ९६६५३०९५९९ |
| ३०) श्री. संतोष शंकर कदम | क्लार्क | ८८५६९२४९८७ |
| ३१) श्री. प्रकाश खुंजीराव चरापले | क्लार्क | ८००७०५४६८७ |
| ३२) श्री. संतोष शामराव मोरे | क्लार्क | ७७७४९९२२०७ |
| ३३) श्री. हणमंत अशोक जाधव | क्लार्क | ९८२२२३१६५० |
| ३४) श्री. अविनाश धोंडीराम भोसले | क्लार्क | ९८९००३२७८३ |
| ३५) श्री. संजय निवृत्ती गोंदकर | शिपाई | ९६५७७२१६०३ |
| ३६) श्री. महेश गजानन पेठकर | शिपाई | ८८३०८८३८०८ |
| ३७) श्री. विजय संभाजी कंदूरकर | शिपाई | ९३७०६०३७४१ |
| ३८) श्री. प्रताप महादेव माळी | शिपाई | ९७६६४०१४१५ |
| ३९) श्री. सुभाष रंगराव माळी | शिपाई | ८४८२९७५०६२ |
| ४०) श्री. उत्तम दशरथ चौगुले | शिपाई | ९५६१५९६९०१ |
| ४१) श्री. बाळकृष्ण बंडू कांबळे | शिपाई | ९७६३१५७२८२ |
| ४२) श्री. दिनकर बबन साठे | शिपाई | ९८८१२७८३२४ |
| ४३) श्री. सचिन शिवाजी घबक | शिपाई | ९११९४८७८१० |
| ४४) श्री. अमोल संजय बल्लाळ | शिपाई | ८३२९७३६९०२ |
| ४५) श्री. स्वप्नील बबन टिबे | क्लार्क | ९७३०७८६७६७ |
| ४६) श्री. किरण अरूण शिंदे | क्लार्क | ९५२७३६२०६१ |
| ४७) सौ. वैशाली रविंद्र पाटील | क्लार्क | ८६०००८२१०३ |
| ४८) श्री. रणजीत जयसिंग जाधव | शिपाई | ७४९९८२६०२६ |

## * पिग्मी एजंट *

| | | |
|---|---|---|
| १) श्री. सुरेश रामचंद्र मगदुम | शाखा पेठ | ८८०६२९५२९५ |
| २) श्री. दिनकर भगवान माळी | शाखा पेठ | ८१८०८३२१३३ |
| ३) श्री. विकास भगवान पाटील | शाखा पेठ | ८६६८३००००३ |
| ४) श्री. श्रीकांत नामदेव जाधव | शाखा पेठ | ८८०५३४२१५१ |
| ५) श्री. दिनकर महादेव शेटे | शाखा इ.पूर | ९३७००९२७४७ |
| ६) श्री. करणसिंग सुमेरसिंग परदेशी | शाखा इ.पूर | ७७६७८३३००१ |
| ७) श्री. महेश शिवाजी कदम | शाखा इ.पूर | ९८२३२२९५९९ |
| ८) श्री. अरूण महिपती पाटील | शाखा इ.पूर | ७६२०३७६२६६ |
| ९) सौ. स्नेहल सचिन पाटील | शाखा इ.पूर | ८७८८९७४७०९ |
| १०) श्री. संभाजी शामराव सावंत | शाखा इ.पूर | ९७६६४३७५८० |
| ११) श्री. सुभाष शंकर पाटील | शाखा इ.पूर | ९९२१३१३१०२ |
| १२) श्री. प्रकाश सदाशिव माळी | शा.कासेगांव | ८६०५७८४०४१ |
| १३) श्री. चंद्रकांत लक्ष्मण खोत | शा. कासेगांव | ९६७३८२९१४४ |
| १४) श्री. रविंद्र दाजी ठोंबरे | शा. कासेगांव | ७२१९०५३०३५ |
| १५) श्री. अजित भिमराव पाटील | शा. कासेगांव | ९६६५६२८७४२ |
| १६) श्री. संदिप मधुकर रेळेकर | शा. कासेगांव | ७६२०३१९९०० |
| १७) श्री. रामचंद्र बाबूराव जोगदे | शा. कासेगांव | ९६२३५८५७७७ |
| १८) श्री. जनार्दन दत्तात्रय सुतार | शा. शेडगेवाडी | ९८५००७१२९५ |
| १९) श्री. संजय विष्णू सावंत | शा. शेडगेवाडी | ९७६७७००२४१ |
| २०) श्री. विजय महालिंग जंगम | शा. शेडगेवाडी | ७४९८२३४९१६ |
| २१) श्री. शंकर रामचंद्र शिंदे | शा.तांदुळवाडी | ९८६००६५०१६ |
| २२) श्री. युवराज रंगराव पाटील | शा.तांदुळवाडी | ९९७५९०९१९३ |
| २३) श्री. प्रकाश दिनकर पाटील | शा.तांदुळवाडी | ९७६४१५२६१६ |
| २४) श्री. अरूण भिमराव पाटील | शाखा मांगले | ९०७५९०५६५६ |
| २५) श्री. राहुल नामदेव डिंगणे | शाखा मांगले | ९७३०१३७३१३ |
| २६) श्री. भगवान गणपती शिंदे | शाखा मांगले | ७६२०३५४०४१ |
| २७) सौ. संगीता संजय गायकवाड | शाखा पलूस | ९९७०२०९९१६ |
| २८) श्री. चकोर चंद्रकांत शहा | शाखा पलूस | ९५०३६२७५५८ |
| २९) श्री. विशाल उत्तम माळी | शाखा पलूस | ९९७५४३५५३५ |
| ३०) सौ. सोनाताई हणमंत मंगसुळे | शाखा पलूस | ७०५७१२४४४० |
| ३१) श्री. उदयसिंग रामकृष्ण साळुंखे | शाखा पलूस | ९८९००९५२३९ |
| ३२) श्री. विश्वाजीत विकास सुर्यवंशी | शाखा पलूस | ७०३००७९११६ |

### सन २०१९-२० ची ध्येय, धोरणे, संकल्प :-

अहवाल सालामध्ये ७० कोटी ठेवीचा टप्पा पूर्ण करणेस सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी केलेल्या सहकार्याच्या विश्वासावरती सन २०१८-१९ ची ध्येय, धोरणे खालीलप्रमाणे

| तपशिल | सन २०१८-१९ | सकंल्प २०१९-२० |
|---|---|---|
| भागभांडवल | ४ कोटी ३९ लाख ३१ हजार | ५ कोटी |
| ठेव | ९० कोटी ३२ लाख २९ हजार | १११ कोटी |
| कर्जे | ७० कोटी ६२ लाख ४८ हजार | ८२ कोटी |
| नफा | १ कोटी ४१ लाख | ४ कोटी ११ लाख |
| थकबाकी | २.९१% | २.००% |
| सभासद | ८८०९ | ९५०० |

वरील ध्येय धोरणे व सकंल्प केले असून ती पूर्णत्वास येणेसाठी आपणाकडून भरघोस सहकार्य मिळावे.

### * संस्थेची वैशिष्टे *

- विन्रम तत्पर सेवा.
- शाखा पेठ, इस्लांमपूर, कासेगांव, तांदुळवाडी व पलूस येथे सोनेगहाण कर्ज सुविधा.
- शाखा पेठ ३६२ दिवस कार्यरत.
- वाहन तारण कर्ज सुविधा.
- RTGS / NEFT सुविधा उपलब्ध.

### सन २०१९-२०२० सालचे खर्चाचे अंदाज पत्रक

| अ.नं. | खर्च | अंदाज सन २०१८-१९ | प्रत्यक्ष खर्च सन २०१८-१९ | अंदाज सन २०१९-२० | कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठेवीवरील दिलेले व्याज | ७,००,००,०००-०० | ६,२५,८२,८२७-०० | ७,००,००,०००-०० | |
| २ | कर्जावरील दिलेले व्याज | ४५,००,०००-०० | २०,४८,४५७-०० | ३२,००,०००-०० | |
| ३ | कमीशन | ५०,००,०००-०० | ४८,५९,४२७-०० | ५०,००,०००-०० | |
| ४ | ऑफिस भाडे | ५,००,०००-०० | ३,७४,१००-०० | ५,००,०००-०० | |
| ५ | प्रिंटींग व स्टेशनरी | २,००,०००-०० | ४२,९०२-०० | २,००,०००-०० | |
| ६ | पगार | ६५,००,०००-०० | ६७,४४,९४२-०० | ७०,००,०००-०० | |
| ७ | प्रवास खर्च | १,००,०००-०० | ५८,२३८-०० | १,००,०००-०० | |
| ८ | किरकोळ खर्च | २,६०,०००-०० | २,७५,०३२-०० | ३,००,०००-०० | |
| ९ | सादील खर्च | ३०,०००-०० | ५,८४९-०० | २५,०००-०० | |
| १० | फोन बील | २,००,०००-०० | १,८८,२५३-०० | २,००,०००-०० | |
| ११ | जाहिरात खर्च | २,४०,०००-०० | २,२२,८७८-०० | २,४०,०००-०० | |
| १२ | लॉकर भाडे | ५,०००-०० | ६,२००-०० | ७,०००-०० | |
| १३ | सभा समारंभ खर्च | १,५०,०००-०० | ६,७९,४००-०० | १,७०,०००-०० | |
| १४ | स्टॅम्प खर्च | ३,०००-०० | ९००-०० | ३,०००-०० | |
| १५ | कर्मचारी प्रशिक्षण खर्च | १,००,०००-०० | ९५,६३८-०० | २,००,०००-०० | |
| १६ | घसारा | १५,००,०००-०० | १२,९८,०५४-०० | १३,००,०००-०० | |
| १७ | टॅक्स ऑडीट फी | ५०,०००-०० | १,५०,०००-०० | १,५०,०००-०० | |
| १८ | लाईट बिल | १,५०,०००-०० | १,५४,४८०-०० | १,७५,०००-०० | |
| १९ | झेरॉक्स खर्च | ५,०००-०० | २,४०५-०० | ५,०००-०० | |
| २० | संस्था व्यवसायकर | ५००-०० | ५००-०० | ५००-०० | |
| २१ | नगरपालीका कर | १०,०००-०० | ०-०० | १०,०००-०० | |
| २२ | पाणीपट्टी | ६,०००-०० | ४,९२०-०० | ५,०००-०० | |
| २३ | घरफाळा | १,०००-०० | ७१२-०० | १,०००-०० | |
| २४ | दुरूस्ती खर्च | १,००,०००-०० | १,३५,३६५-०० | १,५०,०००-०० | |
| २५ | ऑडीट खर्च | २,५०,०००-०० | २,५०,०००-०० | ३,००,०००-०० | |
| २६ | पोस्टेज खर्च | ५,०००-०० | १८,१७१-०० | २०,०००-०० | |
| २७ | संचालक मिटींग भत्ता | ७५,०००-०० | ९४,५००-०० | १,००,०००-०० | |
| २८ | भ.नि.निधी संस्था वर्गणी | ६,५०,०००-०० | ७,३६,७००-०० | ७,५५,०००-०० | |
| २९ | सल्लागार फी (ट्रेनर) | २,००,०००-०० | ३,४९,०००-०० | ५,००,०००-०० | |
| ३० | एन. पी. ए. तरतूद | ७,००,०००-०० | ४३,०३,५२५-०० | ७५,००,०००-०० | |
| ३१ | ट्रेड सर्टिफिकेट फी | १,०००-०० | ५,६८०-०० | १,०००-०० | |
| ३२ | ट्रेड सर्टिफिकेट | १०,०००-०० | ०-०० | १०,०००-०० | |
| | एकूण | ९,७८,११,५००-०० | ८,५६,८९,०५५-०० | ९,८१,२७,५००-०० | |

| अ.नं. | खर्च | अंदाज सन २०१८-१९ | प्रत्यक्ष खर्च सन २०१८-१९ | अंदाज सन २०१९-२० | कारण |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | बोनस व मेहनताना | ११,००,०००-०० | ११,३२,५४७-०० | १५,००,०००-०० | |
| ३४ | वार्षिक देखभाल खर्च | १,५०,०००-०० | ४,८५,०७२-०० | ५,००,०००-०० | |
| ३५ | विकास निधी | १,००,०००-०० | १०,८३,५०६-०० | १०,००,०००-०० | |
| ३६ | कर्मचारी गणवेश | ५०,०००-०० | ५००-०० | ६०,०००-०० | |
| ३७ | बँक कमिशन | २०,०००-०० | ३४,०३८-०० | ४०,०००-०० | |
| ३८ | इमारत निधी | ५,००,०००-०० | १०,००,०००-०० | ५,००,०००-०० | |
| ३९ | इन्कम टॅक्स स्कुटनी फी | २५,०००-०० | ५०,०००-०० | ५०,०००-०० | |
| ४० | टी.डी.एस.रिटर्न फायलिंग फी | १०,०००-०० | १,५२४-०० | १०,०००-०० | |
| ४१ | देणगी | ५०,०००-०० | ६०,२५१-०० | १,००,०००-०० | |
| ४२ | पेटिंग खर्च | ५०,०००-०० | १०,१९०-०० | ५०,०००-०० | |
| ४३ | कोर्ट खर्च | १०,०००-०० | ०-०० | १०,०००-०० | |
| ४४ | इलेक्ट्रीकल मटेरियल खर्च | १०,०००-०० | १०४५-०० | १०,०००-०० | |
| ४५ | कर्मचारी टर्म इन्शुरन्स | २,००,०००-०० | १,५४,४३४-०० | २,००,०००-०० | |
| ४६ | प्रोसेसींग फी | ५,०००-०० | ०-०० | ५,०००-०० | |
| ४७ | वसुली खर्च | ०-०० | ७८,२२४-०० | १,००,०००-०० | |
| ४८ | कर्मचारी कल्याण निधी | ०-०० | ७,००,०००-०० | ५,००,०००-०० | |
| ४९ | आकस्मीत निधी | ०-०० | १,३३,००,०००-०० | ८०,००,०००-०० | |
| ५० | कर्मचारी ग्रॅच्युअटी | ०-०० | ६,६०,०००-०० | ११,१०,०००-०० | |
| ५१ | जी.एस.टी. | ०-०० | १,९८,१२१-०० | २,००,०००-०० | |
| ५२ | शाखा पॅकेज पॉलीशी | ०-०० | ४८,०९७-०० | ५०,०००-०० | |
| ५३ | एन सिक्युअर मेन्टनन्स | ०-०० | ६०,९४२-०० | ७५,०००-०० | |
| ५४ | जहिरात व वर्तमान पत्र खर्च | ०-०० | १,९९५-०० | ०-०० | |
| ५५ | अंदाजे नफा | १,३७,९४,५००-०० | १,४१,१०,७८६-०० | १,७१,११,०००-०० | |
| | **एकूण** | **११,३८,८६,०००-००** | **११,८८,६०,३२७-००** | **१२,९३,०८,५००-००** | |

### सन २०१९-२०२० सालचे उत्पन्नाचे अंदाज पत्रक

| अ.नं. | उत्पन्न | अंदाज सन २०१८-१९ | प्रत्यक्ष उत्पन्न खर्च सन २०१८-१९ | अंदाज सन २०१९-२० | कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जावरील मिळालेले व्याज | ८,९०,००,०००-०० | ९,२७,५५,८६०-०० | १०,१८,००,०००-०० | |
| २ | ठेवीवरील मिळालेले व्याज | २,२०,००,०००-०० | २,३७,८०,५३७-०० | २,५०,००,०००-०० | |
| ३ | शेअर्सवर मिळालेला डिव्हीडंड | १,०००-०० | ०-०० | ०-०० | |
| ४ | नोटीस फी | २५,०००-०० | १७,५१५-०० | २५,०००-०० | |
| ५ | वसुली चार्जेस | ७५,०००-०० | ०-०० | ०-०० | |
| ६ | मासिक दंड | ६०,०००-०० | ३४,१३०-०० | ५०,०००-०० | |
| ७ | दंड व्याज | ५,००,०००-०० | ३,४०,१९०-०० | ३,०८,५००-०० | |
| ८ | इन्सीडेन्सल चार्जेस | २१,००,,०००-०० | १८,४०,५१३-०० | २०,००,०००-०० | |
| ९ | सर्व्हिस चार्जेस | १,००,०००-०० | ७९,९१९-०० | १,००,०००-०० | |
| १० | डी. डी. कमिशन | १०,००-०० | ४७०-०० | १०,०००-०० | |
| ११ | आर.टी.जी.एस. चार्जेस | १५,०००-०० | १०,६०३-०० | १५,०००-०० | |
| १२ | प्रोसेंसिग फी | ०-०० | ५९०-०० | ०-०० | |
| | **एकूण** | **११,३८,८६,०००-००** | **११,८८,६०,३२७-००** | **१२,९३,०८,५००-००** | |

# आपल्या सर्वांच्या सहकार्याने

## १६० कोटीचा व्यवसाय

पुर्ण करू शकलो.
त्याबद्दल सर्वांचे

## हार्दिक अभिनंदन

### * सभासदांना सुचना *

१) सभासदांनी आपले दैनंदिन व्यवहार आपल्या संस्थेतच करावेत.

२) आपला पत्ता बदलेला असल्यास ताबडतोब संस्थेकडे लेखी कळविणेची विनंती आहे.

३) संस्थेच्या पोटनियमानुसार प्रत्येक सभासदास त्यांच्या भागांसाठी वारस (नॉमीनी) म्हणून नांव सुचविणेचा अधिकार आहे. आपण असे नांव अद्यापी सुचविले नसल्यास त्याबाबतचा संस्थेकडील अर्ज पूर्ण भरून देणेची विनंती आहे.

४)सर्व प्रकारच्या व्यवहारांच्या तारखा व आपले कर्ज, तसेच आपण कोणाला किती रकमेला जामीन आहात यांची नोंद ठेवा. वरील बाबत वेळच्या वेळी विचार करण्याने आपले पत व संस्थेचा दर्जा वाढतो.

५) चालु वर्षी कोअर बॅक प्रणाली (C.B.S.) कार्यान्वीत केली असुन सर्व सभासदांनी आपले आधार कार्ड व मोबाईल नंबर नजीकच्या शाखेमध्ये देणेत यावेत.

६) ज्या सभासदांनी के. वाय. सी. पूर्ण केली नसेल त्यांनी पूर्ण करून द्यावी.

७) आपण आपला डिव्हिडंड ज्या त्या वेळी घेवून जावा. अन्यथा ३ वर्षानंतर रक्कम रिझर्व्ह फंडात जमा केली जाईल.

## * परिशिष्ठ " अ " दि. ३१/३/२०१९ *

| | | |
|---|---|---|
| १) संस्थेचे नांव | : | आत्मशक्ती ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या., पेठ. |
| २) मुख्य कार्यालय | : | मेन रोड, बाजार पेठ, पेठ. ता. वाळवा, जि. सांगली |
| ३) शाखा | : | पेठ, इस्लामपूर, कासेगांव, शेडगेवाडी, तांदुळवाडी, मांगले व पलुस |
| ४) रजि. नं. तारीख | : | एस. ए. एन./डब्ल्यु. व्ही. ए./आर. एस. आर./(सी. आर.) ११७२ दि. २२/११/१९८८ |
| ५) कार्यक्षेत्र | : | सांगली, सातारा, कोल्हापूर तीन जिल्हे (विभागीय) |
| ६) मुख्य कार्यालयासह शाखा | : | ८ |
| ७) सभासद | : | ८८०९ |
| ८) नाममात्र सभासद | : | १७८० |
| ९) एकूण निधी | : | रू. ५ कोटी ८१ लाख ७६ हजार |
| १०) वसुल भागभांडवल | : | रू. ४ कोटी ३९ लाख ३१ हजार |
| ११) ठेवी | : | रू.९० कोटी ३२ लाख |
| १२) कर्जे | : | रू. ७० कोटी ६२ लाख |
| १३) गुंतवणूक | : | रू. ३२ कोटी ८१ लाख |
| १४) थकबाकीचे प्रमाण | : | २.९१% |
| १५) ऑडीट वर्ग | : | " अ " |
| १६) नफा | : | रू. १ कोटी ४१ लाख |
| १७) खेळते भांडवल | : | रू. ११० कोटी |
| १८) लाभांश | : | १०% |
| १९) सी. डी. रेशो. | : | ६९.३२% |
| २०) वसुली | : | ९७.०९% |
| २१) ग्रॉस एन. पी. ए. | : | ८.१९% |
| २२) नेट एन. पी. ए. | : | १.८१ % |
| २३) प्रति कर्मचारी व्यवसाय | : | ३ कोटी ४२ लाख |
| २४) कर्मचारी संख्या | : | ४८ |
| २५) पिग्मी एजंट | : | ३२ |
| २६) एकूण व्यवसाय | : | १६० कोटी ९४ लाख |

## ********** आकर्षक ठेवींचे व्याजदर **********

### *** आवर्त ठेव योजना ***

### * मनी प्लस ठेव योजना *

| दरमहा भरावयाची रक्कम | मुदत | मुदतीनंतर |
|---|---|---|
| ₹.१००/- | ६ वर्षे | ₹.१०,०००/- |
| ₹.२५०/- | ६ वर्षे | ₹.२५,०००/- |
| ₹.५००/- | ६ वर्षे | ₹.५०,०००/- |
| ₹.१०००/- | ६ वर्षे | ₹.१,००,०००/- |

### * पंचवार्षिक ठेव *

| दरमहा भरावयाची रक्कम | मुदत | मुदतीनंतर |
|---|---|---|
| ₹.१३५/- | ५ वर्षे | ₹.१०,०००/- |
| ₹.३४०/- | ५ वर्षे | ₹.२५,०००/- |
| ₹.६८०/- | ५ वर्षे | ₹.५०,०००/- |
| ₹.१३६०/- | ५ वर्षे | ₹.१,००,०००/- |

सदर योजनेस आपघाती विमा संरक्षण लागू राहील.

### * लक्षाधीश हप्त्याने *

| मासिक हप्त्याने भरावयाची रक्कम | मुदत | मुदतीनंतर मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| ₹.४००/- | ११ वर्षे | १ लाख |
| ₹.५००/- | ९ वर्षे ७ महिने | १ लाख |
| ₹.६००/- | ८ वर्षे ६ महिने | १ लाख |
| ₹.११००/- | ५ वर्षे ७ महिने | १ लाख |

| | |
|---|---|
| कॉल डिपॉझीट<br>मुदत १५ दिवस | ६-५०% |
| १६ दिवस ते ४५ दिवस | ६-७५% |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ७-००% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ७-५०% |
| १८१ दिवस ते १ वर्षापर्यंत | ८-५०% |
| १ वर्ष ते २ वर्षापर्यंत | ९-५०% |
| जेष्ठ नागरिकांसाठी(०.२५%) जादा | |
| २ वर्ष ते ३ वर्षापर्यंत | ९-७५% |
| जेष्ठ नागरिकांसाठी(०.२५%) जादा | |

* योजना मर्यादित कालावधीसाठी *



**अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.**

### * शाखा *

* मुख्य शाखा पेठ -(०२३४२) २५२७११
* इस्लामपूर -(०२३४२) २२३११०
* कासेगांव -(०२३४२) २३९००९
* शेंडगेवाडी फाटा ता. शिराळा -(०२३४५) २२३२३३
* तांदुळवाडी -(०२३४२) २७६५११
* मांगले ता. शिराळा -(०२३४५) २२०८१४
* पलूस ता. पलूस -(०२३४६) २२८१११

# आत्मशक्ती
## ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्या; पेठ.

### * अध्यक्षीय मनोगत *

**सभासद बंधू भगिनीनो,**

सप्रेम नमस्कार

आपल्या संस्थेचा ३२ वा अहवाल आपल्या हाती देताना आनंद होत आहे. स्व. जयवंतराव भोसले (आप्पा) यांच्या प्रेरणेतुन मा. श्री. हणमंतराव पाटील (बुवा) यांनी पेठ येथे सन १९८८ साली आत्मशक्ती पतसंस्थेची स्थापना केली. त्या संस्थेची ३० वर्षे पूर्ण करीत असताना संस्थेच्या संचालक मंडळ व कर्मचारी वर्गाने यावर्षी १५ कोटी ९५ लाख रूपयेची ठेव वाढ केली. ही केवळ सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतकांचे प्रचंड सहकार्य व विश्वासामुळेच घडू शकले. त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार ! अहवाल सालात संस्थेने सर्व बाबतीत नेत्रदिपक प्रगती केली. ठेवी, कर्ज व एकूण व्यवसायात भरीव वाढ झाली. त्यामुळे संस्थेची नफा क्षमता सुध्दा वाढली. प्रभावी कर्ज वसुली हे आपल्या संस्थेचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. पलूस शाखेची वसुली १००%, तांदुळवाडी शाखेची वसुली ९९.७४% व शेंडगेवाडी शाखेची वसुली ९९.१८% आहे. तसेच ठेवीमधील वाढ तांदुळवाडी शाखा ४५.०६%, इस्लामपूर शाखा ४२.२८% व मांगले शाखा ३७.६४% झाली आहे. तसेच संस्थेने कोअर बँकींग प्रणाली (CBS) चालु केले असुन ग्राहकांना RTGS/ NEFT ची सुविधा अल्प दरात दिली जाते.

संस्थेच्या वाढीचा वेग पहाता सर्व ग्राहकांना याचा निश्चित अभिमान वाटेल. समाजाच्या विकासासाठी सहकार ही सकंल्पना ध्येय, निष्ठा, सत्यता, विश्वास, इमानदारी या पंचसुत्रीचा वापर लोकोपयोगी व समाजहिताची कामे करण्यासाठी केला. सहकाराच्या जमिनीत कितीही वादळ आली तरी अत्यंत चिकाटीने, मेहनतीने, ताठ मानेने उभे राहण्याचे सामर्थ्य संस्थेत आहे. आपण सर्वजण संस्थेची गौरवशाली परंपरा कायम ठेवू. ज्यांनी संस्थेच्या जलद वाटचालीस मदत केली त्यांच्या शिवाय हे कार्य अपूर्ण आहे. संस्थेच्या प्रगतीचा आलेख कायम ठेवण्यासाठी आपले सहकार्य वृध्दींगत व्हावे हीच अपेक्षा.

आपला,

**श्री. हंबीरराव पाटील (दादा)**

चेअरमन

## * पोट नियम दुरूस्ती *

| पोट नियम क्रमांक | सध्या अस्तित्वात असलेला नियम | पोट नियम क्रमांक | सुचविलेली दुरूस्ती | दुरूस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|
| १.३ | संस्थेचे अधिकृत भागभांडवल रू.५,००,००,०००/-(अक्षरी रू. पांच कोटी ) असून भागांची दर्शनी किंमत रू. १००/- राहील. भागभांडवल रू. ५,००,०००/- भागात विभागले जाईल. | १.३ | संस्थेचे अधिकृत भागभांडवल रू.१०,००,००,०००/-(अक्षरी रू. दहा कोटी ) असून भागांची दर्शनी किंमत रू. १००/- राहील. भागभांडवल रू. १०,००,०००/- भागात विभागले जाईल. | संस्थेचा वाढता व्यवसाय व भागभांडवल मर्यादा संपत आल्यामुळे |